# कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई

व्दारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड,नवीन इमारत,४था मजला, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
Website www.dvet.gov.in e mail ost.romumbai@dvet.gov.in Fax 25890216 Phone 25891358/3055

क्रमांक:- प्राकामुं/आस्था/बदली-२०२३/का-१(ड)/3999 दिनांक:-29/08/2024

प्रति,
सर्व संस्था /कार्यालय प्रमुख
मुंबई विभाग

विषय : नियतकालीक बदली सन- २०२४ .
तात्पुरती बदलीपात्र कर्मचारी यादी प्रसिध्द करणेबाबत तसेच ऑनलाईन पोर्टलवर Retention हा पर्याय उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ: १) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १२ मे २००६.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही -२०१७ कार्यसन १२/प्रक्र ४१५,दिनांक ०९/४/२०१८.
३) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक. संकीर्ण १११९ /प्र.क्र.२४/१९/व्यशि-५, दिनांक २०/०९/२०१९
४) संचालनालयाचे पत्र क्र.व्यशिप्र-२०२४/आस्था-२/प्र.क्र.४१/नि.बदल्या२४/का-४. दिनांक २८/०८/२०२४.

उपरोक्त संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था/कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या गट-क संवर्गातील सन-२०२४ या वर्षाकरीता बदलीपात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची तात्पुरती यादी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रसिध्द केलेल्या यादीबाबत काही सूचना/हरकती असल्यास संस्था/कार्यालय प्रमुख यांच्या शिफारशीसह या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे. सदर बाब आपल्या स्तरावरुन कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच बदलीपात्र कर्मचाऱ्यांना Retention या पर्यायाकरीता ऑनलाईन प्रोफाईल मधून अर्ज सादर करावयाचा असल्यास त्यांना **तात्काळ** सदर प्रक्रीया पूर्ण करणेबाबत आपले स्तरावरुन संबंधितांस अवगत करण्यात यावे. विहित वेळेनंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

(अ.गो.गावीत)
सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय मुंबई -८१

प्रत:- १. मा संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई १ यांना माहितीस सविनय सादर.
२. या कार्यालयातील कार्यासन क्र.१(फ) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.